महर्षि न्यायरत्न धुंडिराज विनोद यांचे योगशास्त्राला योगदान

विश्लेषणात्मक अध्ययन

भारतीय धर्म, तत्वज्ञान तथा संस्कृती संकायांतर्गत योगशास्त्र विषयात पीएच्.डी. उपाधीसाठी सादर

करावयाच्या संशोधनाची संक्षिप्त रूपरेखा

संशोधक

संपत भिटे

मार्गदर्शिका

प्रा. कलापिनी अगस्ति

विभाग प्रमुख - भारतीय दर्शन

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय,रामटेक,

नागपूर, महाराष्ट्र

सत्र - २०२४

<u>अनुक्रमणिका</u>

अ. क्र.	विषय सूची	पृष्ठ क्र.
१	प्रस्तावना	३
२	विषयाची आवश्यकता	५
३	पूर्व संशोधन साहित्याचा आढावा	५
४	संशोधनाची उद्दिष्टे	६
५	संशोधनाची परिकल्पना	६
६	संशोधनाची व्याप्ती व मर्यादा	७
७	संशोधन पद्धती	७
८	प्रकरणांची विभागणी	७
९	संदर्भ ग्रंथसूची	९

महर्षि न्यायरत्न धुंडिराज विनोद यांचे योगशास्त्राला योगदान विश्लेषणात्मक अध्ययन

1. **प्रस्तावना -** योगाचे महत्त्व- योग हा भारताचा अनमोल वारसा आहे. भारतीय ज्ञान परंपरेत योगाचे स्थान अमूल्य आहे. जगभरातील लोकसंख्येचा फार मोठा भाग योग एक उपचारपद्धत्ति म्हणुन वापरत आहे. योग पद्धत्ति हजारों वर्षापासून चालत आलेली आहे. त्यामुळे आपण भाग्यशाली आहोत आपल्या देशातील ऋषिमुनि यांनी योग साधने द्वारा आपले शरीर मन चिरकाल तंदुरुस्त तयार केले होते. योग शब्द ऐकले तरी सकारात्मक ऊर्जा वाहु लगते. योग जीवन जगण्याचे तत्वज्ञान आहे. तनाव व्यवस्थानासाठी योग पोषक आहे. शारीरिक महत्त्व- "न तस्य रोगो न जरा न मृत्यु प्राप्तस्य योगअग्निमयं शरीरम्". योग मानसिक, आध्यात्मिक, पारिवारिक, सामाजिक, आर्थिक, नैतिक इत्यादि क्षेत्रात महत्वपूर्ण आहे.

- **आधुनिक योगी –**

पदव्युत्तर शिक्षण घेत असताना दुसर्या वर्षात आधुनिक काळातील योग विचारवंत हा विषय होता. मागील दोन शतकात योग क्षेत्रातील प्रचार व संस्कृति यांचे समाजास मार्गदर्शन करण्याचे कार्य केले आहे. आधुनिक योगी स्वामी विवेकानंद, अरविन्द, स्वामी शिवानंद, कृष्णमाचार्य, महेशयोगी, श्रीराम शर्मा, सत्यानंद सरस्वती, स्वामी कुवलयानंद, बी के एस अय्यंगार इत्यादि यांनी स्वतः साधना करुन आपले अनुभव समाजासमोर मांडले जीवन सुखी शांतिपूर्ण होणेसाठी योग साधना करण्याचा सन्देश दिला आहे. महर्षि न्याय रत्न विनोद हे १९ वे शतकातील गृहस्थ आश्रमातील योग साधक होते. त्यांचे चिंतन समाज प्रबोधन करणारे व आत्मज्ञानासाठी योगसाधना करण्याची प्रेरणा देणारे आहे.

स्वामी कुवलयानंद - जन्म - ३० अगस्त 1883, महानिर्वाण -१८ अप्रैल १९६६.

वैज्ञानिक योग संशोधनाची सुरवात केली. शिक्षक व संशोधक होते १९२४ साली - लोणावला येथे कैवल्यधाम संस्था स्थापन करून योगशास्त्रात वैज्ञानिक संसोधन सुरु केले तसेच योग अभ्यासासाठी विशेष पाहिले जर्नल 'योगमीमांसा' प्रकाशित केले.

बी के एस अय्यंगार- जन्म - १४ दिसंबर १९१८, महानिर्वाण २० अगस्त २०१४. योगशास्त्रात लाभलेले वरदान - तंत्र ज्ञान योग - भारतीय योग प्रशिक्षक व लेखक त्यांना अय्यंगार योग हठयोग पद्धत्तीचे जनक मानले जाते. अय्यंगार हे जगातील सर्वोत्तम योग प्रशिक्षका पैकी एक मानले जातात भारत भर व जगभर योगासने लोकप्रिय करण्याचे श्रेय अय्यंगाराना दिले जाते. त्यांनी अनेक पुस्तकांचे लेखन केले आहे.

- **महर्षि न्यायरत्न धुंडिराज विनोद यांचा परिचय :-**

  जन्म- १२ जनवरी, १९०२ महानिर्वाण - १३ जुलाई १९६९, १९२१ ते २७ - तत्वज्ञान विषयात पद्युत्तर एम.ए शिक्षण. १९२७ अमलनेर येथील तत्वज्ञान मंदिरात रिसर्च फेलो प्रवेश. १९२० पासून स्वातंत्र सेनानी भाग १९३५ करवीर पीठाचे शंकराचार्य यानी भारतीय दर्शनशास्त्र अधिकाराचा गौरव 'न्यायरत्न' ही पदवी. १९५० आस्ट्रेलिया, न्यूज़ीलैंड, सिंगापुर इत्यादि पूर्वेकडील देशात सांस्कृतिक दौरा. १९५३ जागतिक धर्म परिषदेचे संस्थापक सदस्य. १९५४ जापान (टोकियो) येथे भरलेलेय सर्वधर्म परिषदेत विश्वशांति सचिव पदाचा बहुमान. १९५८ पुणे मनपा अध्यात्म महर्षि या पदवीने सम्मान. १९४८ ते १९६५ रोहिणी मासिकात साधनासूत्रे- एकमहाजागर ग्रंथातील सूत्रांचे लेखन. महर्षि विनोद १९ वे शतकातील सामाजिक जाणीव असलेले समाज प्रबोधक, देशभक्त, थॉर विचारवंत, तत्त्वज्ञ, आध्यात्मिक मार्गदर्शक व आणि योगसाधनमय जीवन जगणारे योगी होते.

- **महर्षि न्याय रत्न विनोद यांच्या जीवनावर आणि कार्यवर लिहिलेले साहित्य**

  १. साधनसूत्रे- एक महाजागर

  २. महर्षि विनोद (विचार दर्शन)

३. धवलगिरि

४.अभंग संहिता

५. आधुनिक आरण्यके व एका मूर्तिभंजकाचे तत्वविचार

६. अहो सौभाग्यम्

७. व्यास दर्शन

८. कुंडलिनी जागृति

2. विषयाची आवश्यकता

पदव्युत्तर शिक्षण घेत असताना दुसऱ्या वर्षात आधुनिक योग विचारवंत अभ्यास विषय होता तेव्हा दहा आधुनिक योगी यांचा परिचयात्मक अभ्यास झाला होता महाराष्ट्राला संत व योगी यांची पूर्वीपासून परंपरा लाभलेली आहे. महर्षि न्यायरत्न विनोद हे गृहस्थ आश्रमातील योग साधक होते. त्यांचे ग्रन्थसाहित्य लिखित आहे. महर्षि न्यायरत्न विनोद लिखित साहित्याचे तसेच योगशास्त्राला दिलेले योगदान यांचा सखोल अभ्यास करायला हवा असे वाटले. म्हणून पीएच्.डी. संशोधनासाठी हा विषय निवडला आहे. महर्षि विनोद निर्मित साहित्य समाजासमोर यावे असा या अध्ययनाचा उद्देश्य आहे.

3. पूर्व संशोधन साहित्याचा आढावा

महर्षि न्यायरत्न धुंडिराज विनोद लिखित साहित्यावर पीएच.डी प्रबंधासाठी संशोधन कार्य अप्राप्त आहे. परन्तु कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय रामटेक येथे. एम. फील अभ्यासक्रमाचे वेली महर्षि न्यायरत्न धुंडिराज विनोद यांचे- साधनासूत्रे- एक महाजागर या ग्रंथावर. तेजश्री कावरे यांचे लघुशोध निबंधाचे संशोधन ग्रंथालयात प्राप्त आहे.

त्यामुळे पूर्व संशोधन साहित्य म्हणून त्यांच्या जीवनावर, कार्यावर लिहिलेल्या पुस्तकांचा, ग्रंथांचा संशोधनामध्ये समावेश केला गेला आहे.

महर्षि न्यायरत्न धुंडिराज विनोद यांच्या जीवनावर, कार्यावर लिखित साहित्य :

१) 'साधना सूत्रे: एक महाजागर'

२) महर्षि विनोद (विचार दर्शन)

३) आधुनिक आरण्यके व एका मूर्ती भंजकाचे तत्व विचार

४) धवलगिरी

५) अभंग संहिता

६) अहो सौभाग्यम

७) व्यास दर्शन

८) कुण्डलिनी जागृती

4. संशोधनाची उद्दिष्टे:

१) महर्षी विनोद लिखित साहित्याचा नव संशोधकांना परिचय करून देणे.

२) 'साधना सूत्रे' या ग्रंथातील योग संकल्पना योग साधकासमोर प्रस्तुत करणे.

३) व्यावहारिक आयुष्य जगताना आत्मज्ञानाची प्रेरणा निर्माण करणे.

४) योग्य साधनेद्वारे व्यक्तिमत्व विकास साधणे.

5. संशोधनाची परिकल्पना

- महर्षि न्यायरत्न विनोद यांनी केलेले योग चिंतन समाजाला प्रबोधन करणारे असणार आहे .
- गृहस्थ जीवन जगत असणाऱ्या योगसाधकामध्ये आत्मज्ञानासाठी योगसाधना करण्याची प्रेरणा दैनदीन जीवनात निर्माण होईल.
- महर्षि न्यायरत्न विनोद यांनी योगशास्त्राला योगदान दिले आहे.

6. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

- **व्याप्ती-** या संशोधनात महर्षि धुंडिराज विनोद यांचे योगशास्त्राला योगदान यांचे विश्लेषणात्मक अध्ययन करण्यात येणार आहे.
- **मर्यादा-** या संशोधनामध्ये केवळ योगसाधना आणि योगसाधनेतील संबंधित संकल्पनांचे विश्लेषण, करण्यात येणार आहे.

7. संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनासाठी विश्लेषणात्मक आणि वर्णनात्मक पद्धतीचा अवलम्ब करण्यात येईल. महर्षि न्यायरत्न धुंडिराज विनोद लिखित साहित्य व पतञ्जली योग दर्शन संकल्पनाचे अध्ययन तुलनात्मक पद्धतीने करण्यात येईल.

8. प्रकरणांची विभागणी

- **प्रस्तावना**

या प्रकरणामध्ये विषयाची पार्श्वभूमी मांडण्यात येईल.

प्रकरण -१ - महर्षि न्यायरत्न विनोद यांचे जीवन चरित्र व वाङ्गमय परिचय

१.१- महर्षि न्यायरत्न विनोद यांचे बालपण

१.२-महर्षि न्यायरत्न विनोद यांचे महाविद्यालयीन शिक्षण व

भारतीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास.

१.३- गृहस्थ जीवन

१.४- महर्षि न्यायरत्न विनोद यांचे वक्तृत्व

१.५- महर्षि न्यायरत्न विनोद यांच्या व्यक्तिमत्वाची वैशिष्ट्ये

१.६- महर्षि न्यायरत्न विनोद यांना मिळालेले पुरस्कार व उपाधी

१.७- महर्षि न्यायरत्न विनोद यांनी केलेला अतिंद्रिय शास्त्राचा अभ्यास
संशोधन व जगभरातील संशोधक संस्थांशी त्यांचा आलेला संबंध.

१.८- महर्षि न्यायरत्न विनोद यांची योगसाधना व योग वाङ्मय

प्रकरण- २ महर्षि न्यायरत्न धुंडिराज विनोद लिखित योगविषयक ग्रंथाचा सविस्तर परिचय

२.१- अभंग संहिता

२.२- आधुनिक आरण्यके व एका मूर्ती भंजकाचे तत्वविचार.

२.३- धवलगिरी

२.४- व्यास दर्शन

२.५- 'साधनासूत्रे - एक महाजागर'

२.६ - कुंडलिनी जागृती

प्रकरण- ३) महर्षि न्यायरत्न धुंडिराज विनोद यांच्या ग्रंथातील भक्ति योग, कर्म योग सिद्धांताचे विश्लेषण

३.१. – नामयोगाचे व्याकरण

३.२ – भक्ति विवेक

३.३ - मनुष्य स्वभावतः पूजक वृत्तीचा

३. ४- केवल सदाचरणाने ईश्वर प्राप्ती शक्य?

प्रकरण ४) महर्षि न्यायरत्न धुंडिराज विनोद यांच्या ग्रंथातील हठयोग राजयोग सिद्धांताचे विश्लेषण

४.१- आत्म विद्देची साधना

४.२- जिज्ञासा म्हणजे मुमुक्षा

४.३- संकल्प समाधीचे अंतः स्वरुप

४.४- प्रातिभ दर्शन

४.५- साक्षित्वाची भूमिका हेच जीवनमुक्तावस्थेचे स्वरुप

प्रकरण- ५) महर्षि न्यायरत्न धुंडिराज विनोद यांचे योगशास्त्राला योगदान

५.१- ईश्वरप्रणिधान

५.२- सुमनोपनिषद्

५.३ - स्वामीविवेकानंद

५.४- व्यसन मुक्तीची चतुःसूत्री

५.५ - मन- मनन- मनोलय

५.६ - तत्वज्ञान म्हणझे यथार्थज्ञान

५.७- ध्यानयोग व ध्यान योगाचा वास्तुपाठ

- **उपसंहार / निष्कर्ष**

प्रस्तुत विषया सम्बंधीत वरील संशोधन आराखडयाप्रमाणे निष्कर्ष या प्रकरणात येतील त्याय बरोबर हा 9आराखडा प्राथमिक स्वरुपाचा असल्याने यामध्ये भविष्यात काही बदल असल्यास तसे बदल करण्यात येतील.

9. **संदर्भ ग्रंथसूची**

अ.क्र.	लेखक / ग्रंथकार नाव	ग्रंथाचे नाव	प्रकाशन	ठिकाण	वर्ष
१	बोधनकर, सुधीर	सामाजिक संशोधन पद्धती	श्री साईनाथ प्रकाशन	नागपूर	२०१४

२	महाजन, शं. ग.	मी पीएच. डी होणारच	युनिव्हर्सल प्रकाशन	पुणे	२०१२
३	मंडलिक, विश्वास	पातंजल योगसूत्रे	योग चैतन्य प्रकाशन	नाशिक	२०२३
४	महादेवकर, सुमन	व्यास दर्शन	सा. रा. मुद्रणालय	पुणे	१९७७
५	महादेवकर, सुमन	महर्षि विनोद विचार दर्शन	महर्षि विनोद सिद्धाश्रम सेवा मंडळ	पुणे	२०२३
६	विनोद, धु. गो.	आधुनिक आरण्यके व एका मूर्तिभंजकाचे तत्व विचार	सिद्धाश्रम प्रकाशन	पुणे	१९८४
७	विनोद, धु. गो.	धवलगिरी	मिहाना पब्लिकेशन्स	पुणे	२०२४
८	विनोद, धु. गो.	'साधनासूत्रे: एक महाजागर	महर्षि विनोद सिद्धाश्रम सेवा मंडळ	पुणे	२०२०

मार्गदर्शिका

प्रा. कलापिनी अगस्ती

विभाग प्रमुख, भारतीय दर्शन विभाग

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय,

रामटेक, नागपूर

संशोधक

संपत भिटे

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय,

रामटेक, नागपूर